# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १३८३/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.अशोक शंकर पडवळ,
मु.बाबरे, पो.खराडे,
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय साकडबाव, ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय साकडबाव, ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २/२/२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २८/६/२०२२ | ---- | २९/७/२०२२ | ३०/८/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.१२/१०/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २/२/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *दि.१/३/२०२० ते दि.१/३/२०२२पर्यंत. १)ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व महिला व बालकांची गणना केलेल्या रजिस्टरची छायाप्रत देण्यात यावी. २) महिला व बालकांसाठी कायद्याने विहीत केल्याप्रमाणे ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नांच्या कायद्याने विहीत केलेल्या १० टक्के टक्केवारी प्रमाणे महिला व बालके विकासावर खर्च केलेला सर्व तपशील देण्यात यावा. ३) आपल्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील महिला लाभार्थ्यांना दिलेला लाभ व लाभार्थी म्हणून केलेल्या नोंदीचा व लाभांचा तपशील असलेल्या रजिस्टरची छायाप्रत द्यावी."*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.३०/८/२०२२ रोजी, *" १) ग्रा.पं.हद्दीतील महिला व बालके यांचे गणना रजिष्टर २) महिला बालकावर केलेला १० % खर्च व महिला लाभार्थी यांना दिलेला लाभ ही माहिती प्रथम वर्षे विनामुल्य व उर्वरीत माहिती सशुल्क १५ दिवसांत देण्यात यावी."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.३०/८/२०२२ रोजी आदेश पारित करून १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर देखील अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांचेविरूध्द शास्ती आकारण्यात यावी व शिस्तभंग कारवाई करावी अशी विनंती तक्रारकर्ता यांनी केली.

जन माहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त होऊन देखील सुनावणीस अनुपस्थित असल्याने, याबाबत त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही.

प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण करवारे ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २८/६/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१०/३/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २ फेब्रुवारी २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण करवारे ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव **- यांना प्रत** --गट विकास अधिकारी,
पंचायत समिती शहापूर,
ता.शहापूर जि.ठाणे **यांचेमार्फत रवाना.**(गट विकास अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण तरवारे, ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव यांनी अद्यापपर्यंत तक्रारकर्तास माहिती दिलेली नाही व खुलासा देखील सादर केलेला नाही. ते सदर प्रकरणात यापूर्वीच्या व आजच्या सुनावणीस, सुनावणी सूचना देऊनही अनुपस्थित आहेत. त्यासाठी त्यांनी आयोगाची पुर्वपरवानगी घेतलेली नाही. सबब याप्रकरणी चौकशी करणे आवश्यक आहे. त्यांचे उपस्थितीची खात्री करणेसाठी त्यांना समन्स काढणेत यावे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण तरवारे, ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव यांनी आयोगाच्या दि.२/२/२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे अहवाल सादर केलेला नाही व खुलासा देखील सादर केलेला नाही. तसेच ते सदर प्रकरणात यापूर्वीच्या व आजच्या सुनावणीस सुनावणी सूचना प्राप्त होऊनसुध्दा अनुपस्थित आहेत. त्यासाठी त्यांनी आयोगाची पुर्वपरवानगी घेतलेली नाही. सबब पुढील सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी **विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण तरवारे, ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव** यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १८ (३) (क) अन्वये आयोग कार्यालयाने **किन्वहली पोलीस ठाणे ता.शहापूर जि.ठाणे** यांचेमार्फत समन्सची बजावणी करावी.
२. पुढील सुनावणीस विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण तरवारे, ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव यांनी आयोगाच्या दि.२/२/२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे अहवाल व लेखी खुलासा सादर करावा.
३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२७/४/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० मार्च २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण मधु तरवारे सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती मुरबाड उपस्थित व विद्यमान श्री.दिनेश ठाकरे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकडबांब अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण तरवारे, ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव हे उपस्थित आहेत. आपणास सध्या निलंबित करण्यात आले आहेत अशी माहिती त्यांनी दिली. सध्या श्री.दिनेश ठाकरे हे साकडबांव ग्रामपंचायत येथे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत आहेत, असेही त्यांचेतर्फे सांगण्यात आले.

तक्रारकर्ता यांना अद्यापावेतो माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण तरवारे यांनी माहिती देण्यास झालेल्या विलंबापोटी खुलासा देखील सादर केलेला नाही. त्यांनी खुलासा सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. त्यांना खुलासा सादर करणेसाठी वेळ देण्यात येत आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. पुढील सुनावणीस तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण तरवारे, ग्राम पंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव यांनी आयोगाच्या दि.२/२/२०२६ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.२ प्रमाणे लेखी खुलासा सादर करावा.

२. पुढील सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिनेश ठाकरे, ग्राम पंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव यांनी आयोगाच्या दि.२/२/२०२६ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.१ प्रमाणे माहिती दिलेबाबत अहवाल सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२९/४/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २७ एप्रिल २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.हिरामण करवारे ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत साकडबांव **- यांना प्रत -**

--विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिनेश ठाकरे,
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकडबाव,
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.**यांचेमार्फत रवाना.**(विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

माहितीचा अधिकार

